# जाहीर सुचना/प्रसिध्दी पत्रक

**क्र.२०१८ /जाहिरात /२०१९**
**जिल्हाधिकारी कार्यालय,मुंबई उपनगर,**
**प्रशासकीय इमारत,१०वा मजला,शासकीय**
**वसाहत, बांद्रा (पूर्व),मुंबई-५१**
**दिनांक- ०२/ ०२/२०१९**

महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एसपीपी/१०९९/३०९६/ प्र.क्र.१५२/ पोल-१०, दिनांक ०९ मे २००० तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २५ (३) नुसार मुंबई उपनगर जिल्हयातील न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी याचे न्यायालयातील फौजदारी विभागाचे विशिष्ट खटल्यांचे कामासाठी ०९ (नऊ) रिक्त पदांसाठी विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांचे पॅनल तयार करण्यासाठी खालील नमूद अटी व शर्तीवर मुंबई उपनगर जिल्हयातील वकील/विधीज्ञ यांचेकडून सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता या पदासाठी अर्जदार हा भारताचा नागरीक असावा.
२. सदर पदासाठी अर्जदाराचे ३८ वर्षापेक्षा जास्त असु नये. मागासवर्गीय उमेदवारांसाठी ५ वर्षाने शिथिलक्षम.
३. सदर पदासाठी अर्जदार मान्यता प्राप्त विधी शाखेची पदवी धारण करणारा असावा व वकील म्हणून नोंदणी केलेला व कमीत कमी ०५ वर्षे फौजदारी प्रकरणे चालवण्याचा वकीलीचा अनुभव असावा.
४. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांची नेमणूक ही तात्पुरता स्वरुपाची असून कोणतीही पूर्वसुंचना न देता केव्हाही संपुष्टात आणण्यात येईल.
५. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या नेमणूका फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २५ (३) मधील तरतुदीनुसार विशिष्ट फौजदारी प्रकरणासाठी असली तरी त्यास नेमून दिलेल्या न्यायालयातील बोर्डावरील दैनंदिन फौजदारी प्रकरणे हाताळणे आवश्यक राहिल.
६. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता काम असमाधानकारक असल्याचे निष्पन्न झाल्यास किंवा त्यांचेविरुध्द तक्रार प्राप्त झाल्यास त्यांना कोणतीही पूर्व सुचना न देता त्यांची तात्पुरता स्वरुपातील नियुक्ती रदद करण्यात येईल.
७. तात्पुरता स्वरुपातील पॅनलवर निवड झालेल्या विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्तयाची जिल्हयातील कोणत्याही न्यायालयात काम करण्याची तयारी असावी. त्यांना अन्य कोणत्याही प्रकरणात खाजगी व्यक्तीतर्फे खटल्यात काम करता येणार नाही.
८. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ताने चालवलेंल्या फौजदारी प्रकरणांच्या कामाबाबतचा मासिक अहवाल सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, बृंहन्मुंबई यांचेकडे सादर करावा.
९. सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, बृंहन्मुंबई हे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ताचे पर्यवेक्षी व नियंत्रण अधिकारी असतील व त्यांचे सूचनांचे व आदेशांचे पालन करणे हे निवड झालेल्या तात्पुरत्या स्वरुपातील पॅनलवरील विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्तांना बंधनकारक असेल.
१०. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता म्हणून शासनाचा पूर्णवेळ सेवक म्हणून नियुक्ती नसल्याने तात्पुरत्या स्वरुपाचे पॅनलवर कितीही वर्षे काम पाहिले तरी त्यांना नियमित विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता

पदावर हक्क सांगता येणार नाही. तसेच या कालावधीचा फायदा अन्य कोणत्याही शासकीय पदाचे नियुक्तीकामी वयोमर्यादेतील सुट म्हणून घेता येणार नाही.

११. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्तयांना शासकीय पदाचे कोणतेही फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.

१२. मुंबई उपनगर जिल्हयातील सध्या कार्यरत असलेल्या विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी या पॅनलसाठी अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

१३. विशेष सहायक सरकारी अभियोक्ता पदावर काम करतांना सदर अभियोक्ता लोकसेवक म्हणुन कर्तव्य पार पाडणार असल्याने चारित्र्य पडताळणी आवश्यक.

१४. सदर परिणामकारक सुनावणीसाठी व प्रतिदिनीची कमाल मर्यादा

| | |
|---|---|
| अ) प्रतिदिनी परिणामकारक सुनावणीसाठी व प्रतिदिनी कमाल मर्यादा | रु.६००/- |
| ब) एका जामीन अर्जाच्या विरोधाकरीता | रु.४००/- |
| क) प्रतिदिनाची कमाल मर्यादा | रु.१०००/- |

टिप- एका पेक्षा जास्त सुनावणी किंवा जामीन अर्जांचे विरोधाचे काम चालवले तरी मानधनाची प्रतिदिनी कमाल मर्यादा रु.१००० राहील. प्रस्तावीत तात्पुरत्या स्वरुपातील पॅनलवरील विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्तास कोणत्याही परीस्थितीत प्रतिदिन एकूण रु.१००० पेक्षा अधिक मानधन अनुज्ञेय असणार नाही.

१५. तात्पुरत्या स्वरुपात तयार करण्यात येणा-या पॅनलवरील विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता पदासाठी नमूऩ्यातील अर्ज,स्वत:चा अचूक पत्ता,भ्रमणध्वनी क्रमांक व वैयक्तीक तपशिलास दस्ताऐवजांचे छायांकीत प्रतीसह दिनांक १०/०२/२०१९ ते २५/ ०२ /२०१९ रोजी कार्यालयीन वेळेत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई- ५१ यांचे कार्यालयात पोहोचतील अशा बेताने पाठवावेत. तसेच जाहीर सुचना / प्रसिध्दी पत्रक व अर्जाचा नमुना http://mumbaisuburban.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. तसेच कार्यालयात कार्यालयीन वेळेतही उपलब्ध आहे. मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

(स्वाक्षरीत)

**(सचिन कुर्वे)**

**जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर जिल्हा**

| फोटोवर स्वताची स्वाक्षरी करावी. |
|---|

प्रति,
मा.जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत,१० वा मजला,
वांद्रे (पूर्व) मुंबई-४०००५१

महोदय,

**मी ------------------------------पदासाठी अर्ज करीत असुन माझा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

१. संपूर्ण नांव: ---------------------------------------------------------
(आडनांव प्रथम लिहावे) ---------------------------------------------------------

२. पत्रव्यवहाराचा पत्ता: ---------------------------------------------------------
---------------------------------------------------------
---------------------------------------------------------

३. मोबाईल नं.: ---------------------------------------------

४. अर्जदाराची जन्मतारीख: / /

५. दिनांक. २५ / ०२ /२०१९ रोजीचे वय: ------------ वर्षे----------महिने---------दिवस

**६. अर्जदाराची शैक्षणिक अर्हता:-**

| **शैक्षणिक पात्रता** | **विदयापीठाचे नांव** | **उत्तीर्ण झाल्याचे वर्षे** | **एकुण मिळालेले गुण** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|---|
| पदवी | | | | |
| पदव्युत्तर | | | | |

**७. वकिलीच्या सनदेचा तपशिल :**

सनद मिळाल्याचे वर्षे :-

नोंदणी क्रमांक :-

८. ५ वर्षाच्या वकिलीच्या अनुभवाचा तपशिल :

| अ.क्र. | वर्षे | वकिली तपशिल |
| --- | --- | --- |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

९. **अर्जदारांनी उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने,**

१. शाळा सोडल्याचा दाखला/ जन्म दाखला

२. पदवी प्रमाणपत्र

३. वकिलीची सनद

४. वकिलीच्या अनुभवाची प्रमाणपत्र इ.बाबींच्या साक्षांकीत प्रती पुरावा म्हणून अर्जासोबत सादर करावे.

## घोषणापत्र

१. अर्जदाराकडे वकिलीची सनद आहे काय? होय/नाही

२. अर्जदाराकडे वकिलीचा ५ वर्षाचा अनुभव आहे काय? होय/नाही

३. अर्जदारास मराठी, हिंदी,इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान आहे काय? होय/नाही

४. अर्जदारास महसूल विषयक, सेवाविषयक प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायदयाचे ज्ञान आहे काय? होय/नाही

मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमूद केलेला तपशील माझया माहितीप्रमाणे सत्य व बरोबर आहे. वर दिलेली माहिती खोटी आढळून आल्यास निवड होण्यास मी अपात्र राहीन व भारतीय दंड संहितेअंतर्गत कारवाईस पात्र राहीन याची मला जाणीव आहे.

ठिकाण:

दिनांक: / /२०१९

**अर्जदाराची स्वाक्षरी**

(फक्त विवाहित उमेदवारांसाठी)

## महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ प्रमाणे

### प्रतिज्ञापत्र

### नमुना — अ (नियम ४ पहा)

मी श्री/श्रीमती---------------------------------------------------------------------------

श्री.-----------------------------------------------यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी वय-----------वर्षे

रा.-----------------------------------------------------------------यादवारे पुढील प्रमाणे असे जाहीर

करतो / करते की, १) मी------------------------------------या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला--------------(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दि. २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ----------------इतकी आहे. (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा )

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दि. २८ मार्च २००५ व तदनंतर जन्माला आलेल्या, मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह (अपात्र) ठरविण्यास पात्र होईल. याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक : / / २०१९ अर्जदाराची स्वाक्षरी